आस्थापना : महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाच्या मुंबई मुख्यपीठ व औरंगाबाद, नागपूर आणि पुणे येथील खंडपीठांच्या कार्यालयातील ७१ अस्थायी पदांना मुदतवाढ देणेबाबत..

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग,

शासन निर्णय क्रमांक : एमआरटी २०१८/ प्र.क्र.२११/ज-१अ,

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २१ सप्टेंबर,२०१९

वाचा :

१. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, संकीर्ण-१००२/प्र क्र ६६(भाग-२)/ई-८, दिनांक २० मार्च,२००६.
२. शासन निर्णय,महसूल व वन विभाग, एमआरटी १००७/ प्र.क.८३/टी-१, दि. १२ डिसेंबर, २००७.
३. शासन निर्णय क्रमांक : एमआरटी २०१२/ प्र.क्र.३१/टी-१, दि.२७ मार्च , २०१४
४. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१५/प्र.क्र.८/१६/वित्तीय सुधारणा-१ दि.११ फेब्रुवारी, २०१६.
५. शासन निर्णय क्रमांक : एमआरटी २०१६/ प्र.क्र.६८/टी-१, दि.१९ ऑक्टोबर, २०१६.
६. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/वित्तीय सुधारणा-१ दि.२१ सप्टेंबर, २०१६.
७. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.१० फेब्रुवारी,२०१७.
८. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.३ ऑक्टोबर, २०१७.
९. शासन निर्णय क्रमांक : एमआरटी २०१६/ प्र.क्र.६८/टी-१, दि.३० ऑक्टोबर, २०१७.
१०. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/ आ.पु.क., दि.८ जानेवारी,२०१८
११. शासन निर्णय क्रमांक : एमआरटी २०१६/ प्र.क्र.६८/टी-१, दि.१ फेब्रुवारी,२०१८.
१२. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/ आ.पु.क., दि.५ मार्च,२०१८
१३. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/ आ.पु.क., दि.७ सप्टेंबर,२०१८
१४. शासन निर्णय क्रमांक : एमआरटी २०१६/ प्र.क्र.६८/टी-१, दि.१३ एप्रिल,२०१८
१५. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.एमआरटी-२०१८/प्र.क्र.१८७/ज-१अ, दि.९ ऑक्टोबर,२०१८.
१६. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/ आ.पु.क., दि.२१ फेब्रुवारी,२०१९
१७. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.एमआरटी २०१८/ प्र.क्र.२११/ज-१अ, दि.१५ मार्च,२०१९
१८. प्रबंधक, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई यांचे क्र.ममन्या/आस्था/पदांना मुदतवाढ/ २०१९/ १५२८, दिनांक ५/९/२०१९
१९. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/ आ.पु.क., दि.११ सप्टेंबर,२०१९

प्रस्तावना :-

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता मधील कलम ३१३ आणि ३१४ अनुसार स्थापित महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचे मुंबई मुख्यपीठ व औरंगाबाद, नागपूर व पुणे येथील खंडपीठांसाठी विविध संवर्गातील एकूण ७१ अस्थायी पदे प्रशासकीय व न्यायिक कामाकाजासाठी निर्माण करण्यात आली आहेत. सदर पदांची आवश्यकता लक्षात घेता, या पदांना दि.१/३/२०१९ ते ३०/९/२०१९ या कालावधीसाठी संदर्भाधिन शासन निर्णय क्र.१७, दिनांक १५/३/२०१९ अन्वये मुदतवाढ देण्यात आली होती.

प्रबंधक, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई यांच्या संदर्भाधीन क्र.१८, दि.५/९/२०१९ च्या पत्रान्वये, शासनास प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाच्या कामकाजाकरिता सदर पदांची पुढील कालावधीकरिताही आवश्यकता असल्याने सदरहू ७१ पदांना मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

संदर्भाधीन क्र.१९ च्या वित्त विभागाच्या दिनांक ११/९/२०१९ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारांचा वापर करुन तसेच, संदर्भाधीन क्र.१५ च्या दि.९/१०/२०१८ च्या शासन निर्णयान्वये विभाग प्रमुखांना असलेल्या अधिकारांनुसार खालील अटींच्या अधीन राहून महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाच्या मुंबई मुख्यपीठ व औरंगाबाद, नागपूर व पुणे येथील खंडपीठांच्या प्रशासकीय तसेच न्यायिक कामकाजाकरिता निर्मित **एकूण ७१ अस्थायी पदांना दि. १ ऑक्टोबर, २०१९ ते दि. २९ फेब्रुवारी, २०२०** या कालावधीकरिता मुदतवाढ देण्यात येत आहे.-

१) महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकरिता निर्मित व मुदतवाढ प्राप्त ७१ पदांमध्ये **दि. १ ऑक्टोबर, २०१९ ते दि. २९ फेब्रुवारी, २०२०** या कालावधीमध्ये कोणताही बदल करण्यात येणार नाही.

२) महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकरिता निर्मित व मुदतवाढ प्राप्त ७१ पदे महसूल विभागाद्वारे यापूर्वी दि. २० मार्च, २००६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे निश्चित आकृतिबंधामध्ये समाविष्ट नसल्यास, अशा पदांचा आढावा घेऊन त्या संदर्भातील प्रस्ताव मुदतवाढीच्या कालावधीमध्ये उच्चस्तरिय सचिव समितीची मान्यता प्राप्त करून पदांच्या आवश्यकतेबाबतच्या कारणमिमांसेसह शासनास पाठवावा.

३) महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण यंत्रणेकरिता मंजूर केलेल्या अस्थायी पदांवरील अधिकाऱ्यांच्या /कर्मचाऱ्यांच्या सेवा शासनाच्या पूर्व मंजुरीशिवाय इतर कामांकरिता वापरल्या जाणार नाहीत, याची दक्षता घ्यावी.

४) उपरोक्त सर्व अस्थायी पदांवरील पदधारक प्रचलित शासकीय नियमांनुसार प्रवासभत्ता, स्थानिक पूरक भत्ता यासह इतर अनुज्ञेय भत्ते मिळण्यास पात्र आहेत.

५) सोबतच्या **विवरणपत्र अ** मध्ये दर्शविलेली अस्थायी पदे ही त्या-त्या संवर्गातील तात्पुरती भर समजण्यात येईल.

६) सदर पदांसाठी होणारा खर्च हा -"मागणी क्रमांक सी-४, २०५२- सचिवालयीन सर्वसाधारण सेवा (००) (०९९) महसूल मंडळ, (००) (०१)

महसूल मंडळ (२०५२ ०२२१) " या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० या वित्तीय वर्षात मंजूर होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात येईल.

(७) सदरचा शासन निर्णय, संदर्भाधीन क्र.१९ येथील वित्त विभागाच्या क्र.पदनि-२०१६/प्र क्र ८/१६/आ.पु.क., दिनांक ११/९/२०१९ च्या शासन निर्णयान्वये अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत प्रशासकीय विभागांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९२११८१८१६७३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sunil Shridhar Kothekar

Digitally signed by Sunil Shridhar Kothekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a4e83b3f4c3a086b626255c2b2cb37acdeb67b59b5e9ecbb4d25b60ccef2c660, cn=Sunil Shridhar Kothekar
Date: 2019.09.21 18:05:56 +05'30'

(सुनील कोठेकर)
शासनाचे अवर सचिव

प्रत अग्रेषित :-

(१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई .
(२) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
(३) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
(४) प्रधान सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
(५) अध्यक्ष, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई,
(६) विभागीय आयुक्त, कोकण, पुणे, नागपूर व औरंगाबाद
(७) प्रबंधक, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई.
(८) उपप्रबंधक, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, औरंगाबाद/नागपूर/पुणे
(९) प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
(१०) महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
(११) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
(१२) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
(१३) वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/वित्तीय सुधारणा), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
(१४) ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
(१५) ई-८ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
(१६) निवडनस्ती, ज-१ अ कार्यासन,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

विवरणपत्र अ

शासन निर्णय क्रमांक: एमआरटी २०१८/प्र.क्र.२११/ज-१ अ, दि.२१ सप्टेंबर, २०१९ सोबतचे सहपत्र.

I. *महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचे मुंबई येथील मुख्यपीठ*

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी	पदांची संख्या	शेरा
१.	अध्यक्ष	४०,०००/-	१	
२.	सदस्य (न्यायिक)	२८२३५/-	१	
३.	सदस्य (प्रशासकीय)	३४८८५/-	१	
४.	प्रबंधक	१५६००-३९,१०० ग्रेड वेतन ६६००	१	
५.	उप प्रबंधक	१५६००-३९,१०० ग्रेड वेतन ५०००	१	
६.	लघु लेखक (नि.श्रे.)	९३००-३४,८०० ग्रेड वेतन ४३००	२	१ पद रिक्त आहे.
७.	अव्वल कारकून	५२००-२०२०० ग्रेड वेतन ३५००	६	१ पद रिक्त आहे.
८.	लिपिक-टंकलेखक	५२००-२०२०० ग्रेड वेतन १९००	६	१ पद रिक्त आहे.
९.	दप्तरी	५२००-२०२०० ग्रेड वेतन १९००	१	वरीष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मिळालेला आहे.
१०.	वाहनचालक	५२००-२०२०० ग्रेड वेतन २२००	१	वरीष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मिळालेला आहे.
११.	शिपाई	४४४०-७४४० ग्रेड वेतन १६००	५	४ शिपायांना २४ वर्षाचा लाभ व १ शिपायाला १२ वर्षाचा लाभ मिळालेला आहे.
		एकुण	**२६**	

II *महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचे औरंगाबाद येथील खंडपीठ*

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी	पदांची संख्या	शेरा
१.	सदस्य (न्यायिक)	३३६०५/-	१	पद रिक्त
२.	सदस्य (प्रशासकीय)	२७५४०/-	१	
३.	उप प्रबंधक	१५६००-३९,१०० ग्रेड वेतन ५०००	१	
४.	लघु लेखक (नि.श्रे.)	९३००-३४,८०० ग्रेड वेतन ४३००	२	
५.	अव्वल कारकून	५२००-२०२०० ग्रेड वेतन ३५००	३	
६.	लिपिक-टंकलेखक	५२००-२०२०० ग्रेड वेतन १९००	३	
७.	दप्तरी	५२००-२०२०० ग्रेड वेतन १९००	१	
८.	शिपाई	४४४०-७४४० ग्रेड वेतन १६००	३	
		एकुण	**१५**	

III. महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचे पुणे येथील खंडपीठ

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी	पदांची संख्या	शेरा
१.	सदस्य(न्यायिक)	२९४६५/-	१	
२.	सदस्य (प्रशासकीय)	३५८००/-	१	
३.	उप प्रबंधक	१५६००-३९,१०० ग्रेड वेतन ५०००	१	
४.	लघु लेखक (नि.श्रे.)	९३००-३४,८०० ग्रेड वेतन ४३००	२	१ पद रिक्त आहे.
५.	अव्वल कारकून	५२००-२०२०० ग्रेड वेतन ३५००	३	
६.	लिपिक-टंकलेखक	५२००-२०२०० ग्रेड वेतन १९००	३	
७.	दप्तरी	५२००-२०२०० ग्रेड वेतन १९००	१	पद रिक्त
८.	शिपाई	४४४०-७४४० ग्रेड वेतन १६००	३	२ शिपायांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मिळालेला आहे.
		एकुण	**१५**	

IV. महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचे नागपूर येथील खंडपीठ

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी	पदांची संख्या	शेरा
१.	सदस्य(न्यायिक)	३८२२५/-	१	
२.	सदस्य (प्रशासकीय)	२९२२५/-	१	
३.	उप प्रबंधक	१५६००-३९,१०० ग्रेड वेतन ५०००	१	
४.	लघु लेखक (नि.श्रे.)	९३००-३४,८०० ग्रेड वेतन ४३००	२	
५.	अव्वल कारकून	५२००-२०२०० ग्रेड वेतन ३५००	३	
६.	लिपिक-टंकलेखक	५२००-२०२०० ग्रेड वेतन १९००	३	
७.	दप्तरी	५२००-२०२०० ग्रेड वेतन १९००	१	वरीष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मिळालेला आहे.
८.	शिपाई	५२००-२०२०० ग्रेड वेतन १३००,१६००	३	वरीष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मिळालेला आहे. १ पद रिक्त आहे.
		एकुण	**१५**	
महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचे मुंबई मुख्यपीठ, पुणे,औरंगाबाद व नागपूर खंडपीठ यांमधील एकूण पदे			**७१**	